**MHKO070021142018**

<u>नियमीत दिवाणी दावा क्रं.४/२०१९ मधील नि.क्रं.२७ वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे कथन असे की, वादी यांनी प्रतिवादीविरुध्द मनाईचा दावा दाखल केलेला आहे. सदर दावेतील प्रतिवादी नं.३ सौ. कल्पना मोहन जाधव यांना रा.खिळेगांव, ता.कवठेमंहाकाळ, जि.सांगली या पत्यावर दाव्याचे समन्स बजावणी कामी पाठविणेत आले होते परंतू सदरहू बजावणी रिपोर्ट हा गैरलागू होवून परत आलेला असून पत्ता चुकीचा असलेचे निदर्शनास आलेले आहे. यातील प्रतिवादी नं.३ यांचा पत्ता हा रा.खिळेगांव, ता.अथणी, जि.बेळगांव हा असून नजरचुकीने व अनावधानाने दावेकामी चुकीचा पत्ता लिहणेत आलेला आहे. प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांची काही नुकसान होणार नाही याउलट अर्ज नामंजूर झाल्यास वादी यांचे अपरिमित असे पैश्यात न वसुल होणारे असे नुकसान होणार आहे. तरी प्रतिवादी नं.३ सौ. कल्पना मोहन जाधव यांचे नावासमोर लिहणेत आलेल्या रा.खिळेगांव, ता.कवठेमंहाकाळ, जि.सांगली या पत्याऐवजी रा. खिळेगांव, ता.अथणी, जि.बेळगांव अशी दावेचे कामी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे प्रस्तुत अर्जास सादर वादीचे अर्जातील कथने नाकारलेली आहेत. मे.न्यायालय जरी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याचे निर्णयाप्रत आल्यास तो कॉस्टवर मंजूर करणेत यावी, अशी विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकला. वर नमूद वादी व प्रतिवादी यांच्या कथनावरुन खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करण्यात येत आहेत व त्या मुद्दयांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे पुढील कारणमिमांसेवरुन देत आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सदरची दुरुस्ती दाव्याचा अंतीम निकाल लागण्यास आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

मुद्दा क्रं.१ व २ करीता-

५. प्रस्तुतचा अर्ज व दाव्यातील कागदपत्रे पाहिले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा कायम मनाई मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्रं.३ सौ.कल्पना मोहन जाधव यांना नि.१० अन्वये दाव्याचे समन्स पाठविणेत आले होते परंतू सदरचे समन्स हे न बजावता परत आलेले आहे. प्रस्तुतच्या अर्जान्वये वादी यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी नं.३ यांचा जो पत्ता नमुद केलेला आहे तो चुकीचा असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आलेली असून त्याअंनुषगाने त्यांनी प्रतिवादी नं.३ यांच्या पत्यामध्ये दुरुस्ती करुन मागितलेली आहे. वादींनी मागितलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे त्यामुळे वादींनी दुरुस्तीकरिता दिलेले कारण वाजवी आहे. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना दुरुस्तीचा दाव्याच्या अंतीम गुणावगुणावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक नाही हे संमत न्यायतत्व आहे.

६. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना दुरुस्तीचा दाव्याच्या अंतीम गुणावगुणावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक नाही हे संमत न्यायतत्व आहे. उभय पक्षकारांमधील मूळ वादप्रश्न प्रस्तुत दुरुस्तीमुळे गुणदोषावर मिटण्यास मदत होणार असुन त्यामुळे मूळ वाद मर्यादीत राहून दाव्याचे स्वरुप मर्यादीत राहण्यास मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजुरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादीमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा विलंबाने दाखल केलेला आहे मात्र, त्यामुळे जे प्रतिवादी प्रस्तुत दाव्याकामी हजर झालेले आहेत त्यांची झालेली गैरसोय खर्चाच्या माध्यमातून भरुन येण्यासारखी आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास कोणतीही नवीन केस अथवा दावा निर्माण होत नसुन दाव्याचे स्वरुप बदलत नाही. त्यामुळे प्रतिवादीना नुकसान पोहचत नाही. सबब, मुद्दा क्रं.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी देत आहे व मुद्दा क्रं.२ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम र.₹३००/- इतका खर्च म्हणुन देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सदरची दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत करणेची आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2019.11.16 05:39:30 +0530

ठिकाणः-जयसिंगपूर. (विश्वास पां.शिंदे)

दिनांकः-१४/११/२०१९. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जयसिंगपूर.